# K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR

## Assessment II Paper 2022-23

**Grade: VI** **Marks:100**

**Sub:Marathi** **Time:3 Hours**

---

## विभाग - अ

प्र. १.(अ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा. (७)

मुंबईचे चर्नी रोड उद्यान ! चर्नी रोड उद्यानात सायंकाळच्या वेळी अनेक नागरिक फिरायला यायचे. मुंबई येथील विल्सन हायस्कूलचे मुख्याध्यापक आणि विदयाव्यासंगी लेखक कृष्णाजी अर्जुन केळुस्कर गुरुजीदेखील चर्नी रोड उद्यानात रोज सायंकाळी ५.३० वाजता यायचे. उद्यानाच्या एका बाकावर बसून ते सोबत आणलेल्या पुस्तकाचे वाचन करत असत.

बाकावर बसून वाचन करणाऱ्या कृष्णाजी केळुस्कर गुरुजींच्या लक्षात आले, की थोड्या अंतरावर एक विदयार्थी पुस्तक वाचत आहे. त्या वेळी त्यांनी त्या विद्यार्थ्याकडे फारसे लक्ष दिले नाही. दुसऱ्या दिवशी तो कालचा विद्यार्थी तेथे पुस्तक वाचताना त्यांना दिसला. आता मात्र त्यांच्या मनात कुतूहल निर्माण झाले. तिसऱ्या दिवशीदेखील तोच विद्यार्थी कोणतेतरी पुस्तक वाचताना दिसला. गुरुजींनी अतिशय आपुलकीने त्याला विचारले, “बाळ तुझं नाव काय ?"

"माझं नाव भीमराव रामजी आंबेडकर.'

१.चौकटी पूर्ण करा :

अ. डॉ. बाबासाहेबांचे पहिले नाव------ १

आ उद्यान असलेले ठिकाण----- १

इ. गुरुजींचे नाव------ १

२.एका वाक्यात उत्तरे लिहा :

अ.केळुस्कर गुरुजी कुठे कार्यरत होते. १

आ.उद्यानात आल्यावर केळुस्कर गुरुजी काय करत असत? १

इ. उद्यानात गुरुजींचे कोणाकडे लक्ष गेले ? १

ई. उद्यानात गुरुजी किती वाजता यायचे? १

प्र.१.(आ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा : (७)

पावसाळ्याचे दिवस होते. झाडे, शेते सर्वच हिरवीगार झाली होती. सर्वत्र प्रसन्न वातावरण होते. गावातल्या सोना नदीला भरपूर पाणी आले होते. पावसामुळे नदीचा प्रवाह वाढत होता.आज रविवार. कुंदाच्या शाळेला सुट्टी होती. सुट्टीचा दिवस असल्यामुळे कुंदा आणि तिच्या मैत्रिणी नदीच्या काठावर खेळायला गेल्या होत्या. कुंदा वयाच्या आठव्या वर्षीच पोहायला शिकली होती. पाहता पाहता ती पट्टीची जलतरणपटू बनली होती. नदीकाठच्या कडूनिंबाच्या मोठ्या झाडाखाली सगळ्या मैत्रिणी हासत-बागडत खेळत होत्या.खेळता खेळता लहानगी रझिया व नीला नदीकडे केव्हा गेल्या, ते कळलेच नाही. इकडे कुंदा व तिच्या मैत्रिणी खेळण्यात दंग होत्या. एवढ्यात नीलाचा मोठमोठ्याने रडण्याचा व ओरडण्याचा आवाज आला. ‘धावा! धावा! लवकर या, रझिया पाण्यात पडली.

१)चौकटी पूर्ण करा :

अ) पावसाचे दिवस होते झाडे, शेत सर्वच-------- झाली होती. १

आ) आज रविवार कुंदाच्या शाळेला ...........होती. १

इ) गावातल्या --------- भरपूर पाणी आले होते. १

२.एका वाक्यात उत्तरे लिहा :

अ) कुंदा तिच्या मैत्रिणींसोबत कुठे गेली होती? १

आ) कुंदा कितव्या वर्षी पोहायला शिकली होती? १

इ) लिंबाच्या झाडाखाली सगळ्या मैत्रिणी काय करत होत्या ? १

ई) कोण - कोण नदीकडे गेल्या होत्या? १

प्र २.(अ) पुढील कवितेच्या आधारे सूचनांनुसार कृती करा. (७)

घर शिकवते पाहायला चालायला, धावायला,
घर शिकवते लढायला दुःखाचा डोंगर चढायला.
घराने असावे सावधान,
घराने दयावे समाधान,
घराने ठेवावे काळाचे भान
जवळ करावीत नवी मूल्ये, नवीन ज्ञान.
घरात आईचे अपार कष्ट आजी सांगते सुंदर गोष्ट,
घरात आजोबा गप्पिष्ट
आईच्या हातचे जेवण चविष्ट.

१.आकृती पूर्ण करा :

घर व्यक्तीला काय काय शिकवते ?

अ-------- १

आ---------- १

इ----------- १

ई------------ १

२.एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा :

अ.)घराने कोणत्या गोष्टी जवळ कराव्यात ? १

आ.)आईच्या हातचे जेवण कसे असते ? १

इ.)घरात सुंदर गोष्टी कोण सांगते. १

प्र.२.(आ) पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा: (७)

हवेवरी त्या होत स्वार मी अवकाशी विहरावे,
मनात माझ्या नेहमी येते मी पक्षी व्हावे....
दवबिंदू होऊनी पहाटे सूर्यप्रकाशे वाफ होऊनी
गवतावर उतरावे,
पुन्हा पुन्हा परतावे....
क्षितिजावरचे गडद रंग मी

ढग होऊनी झुलावे,
भरारणारा होऊन वारा
चंद्राशी खेळावे...

१.आकृती पूर्ण करा :
अ.कवयित्रीला कोण कोण व्हावे असे वाटते ---------- २

आ.चौकटी पूर्ण करा :

अ.चंद्राशी खेळणारा ----- १

आ.अवकाशी विहरणारा--- १

इ.गवतावर उतरणारे---- १

२.एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा :
अ. कवयित्रीला अवकाशात कसे फिरावेसे वाटते? १
आ.कवयित्रीला गवतावर कसे उतरावेसे वाटते ? १

प्र.३.(अ)पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा. (७)

सुधा मूर्ती यांचा जन्म 19 ऑगस्ट 1950 रोजी शिगगाव, कर्नाटक मध्ये झाला. त्या एक भारतीय अभियांत्रिकी शिक्षिका आणि कन्नड आणि इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध भारतीय लेखिका आहेत. मूर्ती यांनी संगणक शास्त्रज्ञ आणि अभियंता म्हणून त्यांच्या व्यावसायिक कारकिर्दीला सुरुवात केली. त्या इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्षा आणि गेट्स फाउंडेशनच्या सार्वजनिक आरोग्य सेवा उपक्रमांच्या सदस्या आहेत. त्यांनी अनेक अनाथाश्रमांची स्थापना केली, ग्रामीण विकासाच्या प्रयत्नांमध्ये भाग घेतला, कर्नाटकातील सर्व सरकारी शाळांना संगणक आणि ग्रंथालय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या चळवळीला पाठिंबा दिला आणि हार्वर्ड विद्यापीठात 'द मूर्ती क्लासिकल लायब्ररी ऑफ इंडिया'ची स्थापना केली.मूर्ती यांनी कर्नाटकातील सर्व शाळांमध्ये संगणक आणि ग्रंथालय सुविधा सुरू करण्यासाठी एक धाडसी पाऊल उचलले आणि संगणक विज्ञान शिकवले. डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते सुधा मूर्ती यांना पद्मश्री पुरस्कार मिळाला आहे.

१. चौकटी पूर्ण करा.
आ. सुधा मूर्ती प्रसिद्ध लेखिका आहेत------- . १
आ. सुधा मूर्ती यांनी कशाची स्थापना केली-------- १
इ. सुधा मूर्ती यांना पुरस्कार देणारे------ १

२.एका वाक्यात उत्तरे लिहा.
आ. सुधा मूर्ती यांना कोणता पुरस्कार मिळाला? १
आ. सुधा मूर्तींनी कोणते धाडसी पाऊल उचलले? १
इ. सुधा मूर्तींनी आपल्या व्यवसायिक कारकिर्दीला ची सुरुवात कशी केली? १
इ. सुधा मूर्ती यांचा जन्म कुठे झाला? १

प्र.३.(आ) पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा: (७)
नाच रे मोरा आंब्याच्या वनात नाच रे मोरा नाच
ढगांशी वारा झुंजला रे काळा, काळा कापूस पिंजला रे

आता तुझी पाळी, वीज देते टाळी फुलव पिसारा नाच, नाच रे मोरा
झरझर धार झरली रे झाडांची भिजली इरली रे
पावसात न्हाऊ, काहीतरी गाऊ करुन पुकारा नाच, नाच रे मोरा

१). कवितेच्या ओळी पूर्ण करा :

अ.)नाच रे मोरा आंब्याच्या ---- १

आ) ढगांशी वारा ---- १

इ) काळा काळा कापूस---- १

ई) वीज देते टाळी फुलव ---- १

२) एक वाक्यांत उत्तरे लिहा :

अ.)आंब्याच्या वनात कोण नाचतो आहे? १

आ.) वारा कशाशी झुंजला आहे? १

इ.) मोर कसा नाचतो आहे? १

प्र ३.(इ) खालील विचारलेल्या कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे लिहा. (१२)

१.)'सुट्टी कधी संपली, ते आम्हांला समजलेच नाही' असे मुलाला का वाटले? तुमच्या शब्दांत लिहा.

२.)आलेल्या पावसामुळे बाबांनी चडफड का केली?

३.)सुगरण पक्षी कुटुंबवत्सल कसा? ते लिहा.

४.)कुंदाला नदीवर कोणते दृश्य दिसले?

५.)गणित विषय वैष्णवीचा लाडका होण्यासाठी बाबांनी कोणते उपाय सुचवले आहेत?

**विभाग - ब**

प्र ४.) सूचनेनुसार कृती करा. (२०)

१.) समानार्थी शब्द लिहा. (२)

अ) पक्षी - आ) पृथ्वी -

२.) विरुद्धार्थी शब्द लिहा. (२)

अ) जवळ × आ) शूर ×

३.) वचन बदला (२)

अ) नदी - आ) बातमी -

४.) लिंग बदला. (२)

अ) महाराज- आ) बैल -

५.) खालील वाक्यात नाम ओळखा. (२)

अ.) समोरून बैल येत होता.

आ.) खचला किल्ला.

६). पुढील वाक्यातील रिकाम्या जागी कंसातील योग्य सर्वनामे लिहा. (३)

अ) ----- गावाला जा.(तुम्ही, आपण, आम्ही)

आ) ------ मनात कुतूहल निर्माण झाले (त्याच्या ,तो, मी)

इ) ------फोटो छान येतो. (तुला, मी, त्याचा)

७.) खालील दिलेल्या वाक्यांमध्ये योग्य विरामचिन्हाचा वापर करा. (३)

अ) गावकरी शेतकऱ्याकडं दूध तूप लोणी दही पदार्थ विकत घेत

आ) बाळ तुझे नाव काय

इ) गुरुजी व भीमराव यांच्यात गट्टी जमली

८.) खालील वाक्यातील काळ ओळखा. (१)

अ) उद्या सकाळी रीमा मामाच्या गावाला जाणार आहे.

९.) पुढील वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करा : (३)

अ) गहिवरून येणे.

आ) चिकाटीने काम करणे.

इ) दंग होणे.

**विभाग- क**

प्रश्न.५अ) खालील दिलेल्या  कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा (८)

अ) माझी शाळा

आ) दिवाळी

प्रश्न.५आ) खलील दिलेल्या कोणत्याही एका विषयवार पत्र लिहा. (६)

अ) पुस्तकाची मागणी करण्याकरता नवनीत पब्लिकेशन ला पत्र लिहा.

आ) वडिलांना पत्र: तुम्हाला चित्रकलेच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला आहे ते वडिलांना पत्राद्वारे कळवा.

प्रश्न.६.अ) खालील दिलेले विषयावर जाहिरात लिहा. (६)

अ.'अन्नपूर्णा' भाजी पोळी केंद्र या विषयावर जाहिरात लिहा.

**महत्वपूर्ण मुद्दे_**

१. स्वच्छतेचे काटेकोर पालन.

२. उत्तम दर्जाच्या धान्याचा वापर.

३. तुमच्या आरोग्याचे संपूर्ण काळजी घेणारे.

प्रश्न.६.आ) 21 जून आंतरराष्ट्रीय योगा दिवसाचे चित्र वर्णन करा. (६)

---


अंतरराष्ट्रीय योग दिवस